# सामाजिक भान जपणारा उत्तुंग

**प्रथमेश दोंड,**
स्टर्लिंग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज
muntainbox@gmail.com



आपण समाजाचं देणं लागतो, या भावनेनं माटुंगा येथील **पोदार कॉलेजचं** एनएसएस युनिट अनेक सामाजिक उपक्रम राबवत असतं. त्याचाच एक भाग म्हणून एनएसएस युनिटचा 'उत्तुंग' २ आणि ३ जानेवारी, २०२३ रोजी संपन्न होणार आहे. या फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर आहे. मुंबई आणि आसपासच्या अनेक नामांकित कॉलेजांनी उत्तुंगसाठी नावनोंदणी केली आहे. नृत्य, साहित्य, ललित कला, क्रीडा, नाट्य आणि फोटोग्राफी अशा विभागांतर्गत ९हून अधिक इव्हेंट्सची पर्वणी स्पर्धकांसाठी असेल. या फेस्टची यंदाची थीम शिक्षणावर आधारित असून आयोजित सर्वच इव्हेंट्समध्ये त्या थीमचा प्रभाव जाणवतो.

उत्तुंगच्या पहिल्या दिवशी सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून भाकर संस्थेतर्फे काही शाळकरी मुलं उत्तुंग फेस्टमध्ये सहभागी होतील. शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, त्यादृष्टीनं ट्रेझर हंटसारखे अनेक रंजक खेळ खेळले जाणार आहेत. तर दुसऱ्या दिवशी नाट्य विभागांतर्गत 'ऐका हो ऐका' या पथनाट्य स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. आयोजकांनी दिलेल्या विषयांसह शिक्षण या विषयाची सांगड घालत, पथनाट्य सादर करायचं आहे.

**महाराष्ट्र टाइम्स**
**मीडिया पार्टनर**

गेल्या वर्षी करोनामुळे उत्तुंग हा फेस्ट व्हर्च्युअल पद्धतीनं आयोजित करण्यात आला होता. यंदा ऑफलाइन पद्धतीने आयोजित होतोय, यासाठी कॉलेजच्या एनएसएसच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. विनीता पिंपळे, शिक्षक प्रमुख संजय ढगे आणि प्रिन्सिपल डॉ. शोबना वासुदेवन यांचं मोलाचं मार्गदर्शन टीम उत्तुंगला लाभलं.

## 'जांच पडताल'ची पर्वणी

'जांच पडताल' हा फ्लॅगशिप इव्हेंट असून यात निवडक विषयांवर अभ्यास, संशोधन करुन त्यावर अहवाल सादर करण्याचं आव्हान असेल. समाज माध्यमांचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम, ऑफलाइन शिक्षणाचं महत्त्व असे अनेक विषय संशोधनासाठी दिले आहेत.

## मनसोक्त थिरका, मनातलं बोला

नृत्य विभागाच्या 'आजा नच ले' या इव्हेंटमध्ये फ्री-स्टाइल आणि शास्त्रीय नृत्याचा मिलाफ करत शिक्षण या संकल्पनेवर आधारित कथा आपल्या नृत्यातून सादर करण्याचं आव्हान स्पर्धकांसमोर असेल. तर साहित्य विभागात 'मन की बात' इव्हेंटमध्ये स्पर्धकांना स्पर्धेच्या दिवशी विषय देण्यात येतील त्यावर आधारित संहिता लिहायची असेल.

## ललित कलेतून सामाजिक उपक्रम

ललित कला विभागांतर्गत स्पर्धकांना कापडी पिशवी दिलेल्या विषयानुसार रंगवणं अपेक्षित असेल. या कापडी पिशव्या पोदार कॉलेजने दत्तक घेतलेल्या बऱ्हाणपुर या गावातील आदिवासी कुटुंबाना दान देण्यात येणार आहेत, अशी माहिती आयोजन समितीची सदस्य ऐश्वर्या नाईकने दिली. इव्हेंटच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवण्याच्या संकल्पनेमुळे टीम उत्तुंगचं कौतुक होतंय. तर रांगोळी स्पर्धेतही शिक्षणाचं महत्त्व रंगांद्वारे अधोरेखित करण्याचं आव्हान स्पर्धकांसमोर असेल.

TIMES inter act
THANE